**: निशाणी २८ व २९ वर समान आदेश :**
**(CNR No. MHAKO70009002013)**

१. वादीने अर्ज निशाणी २८ दाखल करुन प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ होण्याकरिता तसेच अर्ज निशाणी २९ दाखल करुन अबेटमेंटचा हुकुम रद्द होण्यासाठी विनंती केली आहे. प्रस्तुत दोन्ही अर्जावर प्रविादींचे म्हणणे मागविण्यात आले. परंतु प्रतिवादींनी म्हणणे सादर केले नाही. वादींतर्फे युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा कराराच्या विर्निदिष्ट पालनासाठी व करणात्मक व्यादेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे हे दिनांक १२/०३/२०१६ रोजी मयत झाले. प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याबाबत पुरसीस अभिलेखावर दाखल न केल्याने वादी सदर चा अर्ज अभिलेखावर दाखल करु शकले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ विरुध्द अबेटमेंटचा आदेश पारित झाला. परंतु वादींना प्रस्तुत दाव्याच्या निर्णयाकरिता मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. म्हणुन वादींनी अबेटमेंटचा हुकुम रद्द करुन वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करण्याकरिता अर्ज दाखल केले आहेत. वादींना मयत प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे यांचे वारस अभिलेखावर आणण्याची संधी न दिल्यास वादीचे नुकसान होईल उलट प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही.

२. अभिलेख पाहिला असता वादीने प्रस्तुत दावा कराराच्या विर्निदिष्ट पालनासाठी व करणात्मक व्यादेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे हे दिनांक १२/०३/२०१६ रोजी मयत झाले. वादींनी सदर बाब माहिती नसल्याने प्रतिवादी क्र. १ विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश पारित झाला व त्यांना प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणण्याचा अर्ज सादर करता आला नाही. प्रस्तुत दोन्ही अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वरील परिस्थीतीत दावा चालविण्याचा हक्क शाबीत असल्याने वारसाला अभिलेखावर आणणे आवश्यक असुन त्यासाठी झालेला विलंबही माफ करणे गरजेचे आहे. तसेच अबेटमेंटचा आदेश रद्द करणे सुध्दा आवश्यक आहे. सबब दोन्ही अर्ज मंजुर करणे न्यायाचे हितास्तव आवश्यक झालेले आहे. सबब प्रस्तुत अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१. वादींचे अर्ज नि. २८ व २९ मंजुर करण्यात येतात.

२. मयत प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो तसेच मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

सही/-

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : ०५.०२.२०१९. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.V. Indane. |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 05/02/2019. |
| Signed by Presiding Officer on | : | 05/02/2019. |
| Uploaded on | : | 05/02/2019. |

……………………………………………………………………………………………………